**निशाणी क्रमांक – ०९**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०१</u>**

माझे नाव — रामजी बालाजी होनराव,

वय – ३५ वर्षे धंदा – नौकरी,

रा.धानोरा खु, ता. अहमदपूर, जि.लातूर.

**<u>शपथेवर सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एन. ए. भांगे.</u>**

**(फौजदारी प्रकिये संहितेच्या कलम २९९ अन्वये)**

**०१.** मी आरोपींना ओळखतो. फिर्यादी माझे वडील आहेत. मी औरंगाबाद येथे मिलीट्री भरतीसाठी सन २००८ मध्ये गेलो होतो. त्याठिकाणी आरोपींची व माझी ओळख झाली. आरोपी क्र.२ हे मिलीट्रीमध्ये होते. आरोपी क्र.२ मला त्यांचे अधिकारी ओळखीचे आहेत असे म्हणाले. त्यांनी मला ते साहेबांशी बोलावून घेतील असे सांगून मला घरी जाण्यास सांगितले. ते मला तेथील साहेबांशी मला नौकरी लावण्याबाबत बोलतील असे म्हणाले होते.

**०२.** आरोपी क्र.२ चार दिवसांनी माझ्या गावाकडे तिलक धानोरा, ता.अहमदपूर येथे आले. त्यांनी मला विश्वासात घेऊन माझे नौकरीचे काम करतो असे म्हणाले. ते एक दिवस माझ्या घरी मुक्कामी राहिले. त्यावेळी आमचे पैशांबाबत बोलणे झाले. आरोपी क्र.१ व २ यांच्या बॅंक खात्यावर मी प्रत्येकी रुपये २५ हजार टाकण्याचे ठरले. आमचा पुर्ण व्यवहार प्रत्येकी रुपये ५० हजार देण्याचा ठरला होता. माझ्या वडीलांनी गावातील एका ओळखीच्या माणसाला ज्याचे नाव संजय सदाशिव नागसागरे यांना घेऊन जाऊन बॅंकेत जाऊन आरोपीच्या स्टेंट बॅंक इंडीयामधील दोन खात्यांवर पैसे टाकले होते. त्याचे खाते क्रमांक मी सांगू शकत नाही. जास्त दिवस

**निशाणी क्रमांक – ०९**

उलटल्याने मी ते नंबर सांगू शकत नाही. दोन ते चार महिन्यानंतर आम्ही आरोपी क्र.२ ला फोन लावला. आम्ही त्यांना काम कुठपर्यंत झालेले आहे असे विचारले असता त्यांनी काम होत आले आहे असे सांगितले. त्यानंतर आम्ही फोन केला असता त्यांनी फोन उचलले नाही. आम्ही त्यांच्या गावाकडे जाऊन आलो. तिथे त्यांनी आम्हाला काय करायचे करून घ्या असे सांगितले. त्यानंतर आम्ही केस केली. पोलीसांनी माझा घटनेबाबत जबाब घेतला होता.

श्रृवणोत्तर स्वीकृत, माझे समक्ष,

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by WADGAONKAR SWANANDI DEVIDAS
Date: 2025.10.31 15:41:44 +0530

दिनांक –३१.१०.२०२५ **(स्वानंदी दे. वडगांवकर)**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहमदपूर.